**मिरा-भाईंदर महानगरपालिका**

**माहिती व जनसंपर्क विभाग**

**प्रसिद्धी पत्रक**

- **केंद्र सरकार पुरस्कृत अभियानांची मूल्यमापन मोहीम सुरू**
- **देशातील ६० शहरांमध्ये झाली मिरा भाईंदर शहराची निवड**

**मिरा-भाईंदर, १३ मार्च २०२५:** केंद्र सरकारच्या नीती आयोगाच्या विकास अन्वेषण व मूल्यमापन संघटनेकडून देशातील ६० शहरांमध्ये केंद्र प्रायोजित योजनांचे मूल्यमापन सुरू झाले आहे. या मूल्यमापन मोहिमेत मुंबई महानगर प्रदेशातून केवळ मिरा भाईंदर शहराची निवड करण्यात आली आहे. सध्या मिरा भाईंदर शहरात राबविण्यात येणाऱ्या अभियानांचे मूल्यमापन करण्यास सुरुवात झाली आहे.

शाश्वत प्रगतीसाठी विविध उपक्रम राबविणाऱ्या शहरांची, विविध निकषांच्या आधारे निवड करून त्यांचे मूल्यामापन नीती आयोगाद्वारे करण्यात येत आहे. मिरा भाईंदर महानगरपालिका शहराच्या शाश्वत विकासासाठी विविध उपक्रम, मोहीम राबवत आहे. त्यामुळे देशतील निवडक ६० शहरांमध्ये मिरा भाईंदर शहराचा समावेश झाला आहे. मुंबई महानगर प्रदेशातील केवळ मिरा भाईंदर हे निवड झालेले एकमेव शहर आहे. नीती आयोगातर्फे शहरी तज्ज्ञ मा. सोमा सरकार यांनी १२ मार्च २०२५ रोजी मिरा-भाईंदर महापालिकेला भेट देऊन आयुक्त तथा प्रशासक राधाबिनोद अ. शर्मा (भा.प्र.से) यांची भेट घेतली.

नीती आयोगा तर्फे 'शहर परिवर्तन' घटकांतर्गत स्वच्छ भारत अभियान, अमृत योजना, दीनदयाल अंत्योदय योजना-राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान आदींचे मूल्यमापन करण्यात येणार आहे. या अभियानांची अंमलबजावणी कशी सुरू आहे, त्याचा प्रभाव कसा आहे आदींचे नियोजनबद्ध सर्वेक्षण केले जात आहे. मिरा-भाईंदर महानगरपालिकेमध्ये सर्वेक्षण मोहीम २७ मार्च २०२५ या कालावधीत राबवली जाणार आहे.